शै. वर्षामध्ये महाविद्यालयाने निर्धारित केल्याप्रमाणे इ.11 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांचे गणवेश, ओळखपत्र पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येतात. त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांची नियमित हजेरी घेण्यात येते व या सर्वांची नोंद शिक्षक-पालक योजनेचे रजिस्टर तयार करण्यात येवून त्यात करण्यात येते. पालकांशी संवाद रहावा विद्यार्थ्यांचे महाविद्यालयात वर्तन, वेळोवेळी घेण्यात आलेल्या परीक्षा त्यामधील विद्यार्थ्यांचे गुण या सर्वांची सविस्तर कल्पना पालकांना यावी याकरिता गृह भेटीचे नियोजन करुन या गृहभेटी नियोजनाप्रमाणे पूर्ण करण्यात येतात. या नोंदी शिक्षक-पालक योजने अंतर्गत तयार करण्यात आलेल्या स्वतंत्र नोंदवहीमध्ये करण्यात येतात.

* * * *

## परीक्षा (मूल्यमापन) विभाग

व्यवसाय अभ्यासक्रमा करीता स्वतंत्र परीक्षा विभाग कार्यरत आहे. सध्याचे परीक्षा प्रमुख हे एच.एस.सी.बोर्ड, पुणे च्या अभ्यास मंडळाचे सहनिमंत्रक असल्यामुळे आपल्या महाविद्यालयात अद्ययावत बोर्ड पॅटर्न प्रमाणे सर्व परीक्षा होतात. व्यवसाय अभ्यासक्रमात 60% गुणदान प्रात्यक्षिकाधारीत असल्यामुळे त्यासाठी वैशीष्ट्यपूर्ण रेकॉर्ड बुक आणि सेशनल पुस्तीकांचा वापर केला जातो. अनिवार्य असलेल्या सहा विषयासोबतच पर्यावरण व आरोग्य शिक्षण हे विषय गांभीर्याने घेतले जातात. प्रश्नपत्रिका व मार्कमेमो हे बोर्ड पध्दतीप्रमाणे संगणकीय स्वरुपाचे असतात.





## प्राचार्यांचे मनोगत

प्रिय विद्यार्थी बंधु - भगिनी

इयत्ता दहावी /अकरावी वर्गाच्या परीक्षेमध्ये तुम्ही मिळविलेल्या यशाबद्दल आपले हार्दिक अभिनंदन !

पुढील शिक्षणासाठी आपण या महाविद्यालयात प्रवेश घेत आहात, आपले मन:पूर्वक स्वागत. या महाविद्यालयात + 2 स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम आणि संगणकशास्त्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

विद्यार्थी मित्रांनो, अकरावी-बारावी + 2 स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमास उच्च शिक्षणाच संधी प्राप्त करण्यासाठी आणि रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. हे व्यवस्थितपणे समजून घेवुनच योग्य अभ्यास क्रमाची निवड करणे गरजेचे असते.

आई-वडिल, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि अन्य जाणकार व्यक्तींचे मार्गदर्शन घ्या. त्याच बरोबर आपली स्वत:ची आवड विचारात घेऊन योग्य व्यवसाय अभ्यासक्रमाची निवड करण्याची ही काळजी घेतली म्हणजे आपले भविष्य उज्वल आहे यात संशय नाही.

खोलेश्वर महाविद्यालय हे भारतीय शिक्षण प्रसारक संस्था द्वारा संचलित एक संस्कार केंद्र आहे. भा.शि. प्र. संस्थेची स्थापना 28 जून 1951 सली झाली, मराठवाडा विभागामध्ये संस्थेची शाळा महाविद्यालये अशी एकूण 33 संस्कार केंद्रे आहेत, या विशाल परिवाराचे आपण घटक आहोत, याची जाणीव आपण ठेवली पाहिजे.

***''।। केल्याने होते आहे रे । आधि केलेची पाहिजे ।। ''***

अर्थात – 'जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर प्रत्यक्ष कृती केली पाहिजे.'

हे बोध वाक्य संस्थेने स्विकारले आणि शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रमांच्या माध्यमातून संस्कारित व सुजाण युवा पिढी घडविण्याचे पवित्र व महत्वाचे कार्य आपली संस्था अथकपणे करीत आहे, म्हणूनच भा.शि.प्र. संस्थेचा समाजमानवार एक वेगळा ठसा उमटलेला दिसून येतो.

खोलेश्वर महाविद्यालय जून 1972 ला स्थापन झाले गेल्या त्रेचाळीस वर्षामध्ये या महाविद्यालयाने गुणवत्ता, अनुशासन आणि शिस्तीचे एक वैभवशाली परंपरा निर्माण केली आहे. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे ''राष्ट्र निर्माणासाठी माणूस घडविणे आणि चारित्र्य निर्माण करणे हेच शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे.'' हे ध्यानात ठेवून हे महाविद्यालय विद्यार्थ्याच्या परिपूर्ण व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्नरत आहे. त्यासाठी नियमित अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन कार्याबरोबरच विविध मंडळे आणि उपक्रमांची रचना केली आहे.

आपण या उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा, व्यायामशाळा,ग्रंथालय, संगणक विभाग, सुसज्ज प्रयोगशाळा, क्रीडा विभाग, इ. सुविधांचा योग्य उपयोग करावा , आपले निर्धारित ध्येय साध्य करावे. आजच्या ज्ञानाधिष्ठित समाजाचा एक सक्षम घटक म्हणून सिद्ध व्हावे यासाठी आपल्या भावी शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

प्राचार्य





## विविध पारितोषिके

1. **कै. मनोहरशास्त्री जोशी पारितोषिक**
   हे पारितोषिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेतल्या जाणाऱ्या इ.12 वी परीक्षेत 'संस्कृत' विषयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास दिले जाते.
2. **कै. डॉ. सुधीर प्रकाशराव पन्हाळे पारितोषिक**
   हे पारितोषिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा तर्फे घेतल्या जाणाऱ्या इ.12 वी परीक्षेत व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात येते.
3. **कै. लक्ष्मीकांत रंगराव जोशी पारितोषिक**
   हे पारितोषिक इ. 12 वी मंडळ परीक्षेत महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या अधिकोषण विषय घेतलेल्या विद्यार्थ्यास दिले जाते.
4. **कै. शरद नारायणराव कुलकर्णी पारितोषिक**
   हे पारितोषिक इ. 12 वी मंडळ परीक्षेत बँकिंग विभागात किमान 85.00 गुण मिळवणाऱ्या परंतू बँकिंग विषयाच्या तीन पैकी दोन पेपर मध्ये 90 पेक्षा जास्त गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिले जाते.

* * *

## शिक्षक – पालक योजना

महाविद्यालयामध्ये विषय शिक्षक आणि विद्यार्थी पालक यांच्यामध्ये स्नेहसंबंध निर्माण व्हावेत. या उद्देशाने शिक्षक-पालक योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या अंतर्गत शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेश प्रक्रिया पुर्ण होऊन अध्ययन/अध्यापनास सुरुवात झाल्यानंतर इ.11 वी आणि 12 या दोन्ही वर्गांचे विहीत नमुन्यामध्ये तयार करण्यात आलेले शिक्षक पालक योजनेचे आवेदन पत्र भरुन घेण्यात येतात. यानंतर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेली आचारसंहिता व वर्तन संकेत आवेदन पत्र विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पालकांना अवलोकनासाठी देण्यात येतात व त्यावर पालकांची स्वाक्षरी घेण्यात येवून संबंधीत विभागामध्ये त्याची पंजिका तयार करण्यात येते.

## + 2 स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम विभाग प्राध्यापक व कर्मचारी वृंद

| प्रा.डॉ. र.रा.कुंबेफळकर | प्रा.डॉ. नि. भा. धर्मराव |
|---|---|
| (एम.बी.बी.एस/एक्स-रे) | (एम.बी.बी.एस. एम.एल.टी.) |
| **पर्यवेक्षक** | **उपप्राचार्य** |

| | | |
|---|---|---|
| 1. प्रा.कु.ए.आर.बर्दापुरकर | बी.एस्सी,डी.एम.एल.टी | एम.एल.टी |
| 2. प्रा.डॉ.जीबी.चौसाळकर | बी.ए.एम.एस. | एक्स-रे |
| 3. प्रा.अ.म.चौधरी | एम.एस्सी. (ॲग्री) | हॉर्टीकल्चर |
| 4. प्रा.वि.स.राजगुरु | बी.एस्सी. (ॲग्री) | हॉर्टीकल्चर |
| 5. प्रा.यो.श.कुलकर्णी | एम.कॉम.एम.फील,डी.सी.ए. | बँकींग |
| 6. प्रा.ब.स.बनसोडे | एम.कॉम.,बी.एड.,डी.बी.एम | पी.एस.के. |
| 7. प्रा.अ.अ.डुबे | एम.कॉम.एम.फील | पी.एस.के. |
| 8. प्रा.सु.वि.तोडीवाले | एम.एस्सी.(कॉम्प्यू.)एम.एड | कॉम्प्यू.टेक्निक |
| 9. प्रा.र.प्र.वैद्य | एम.एस्सी.(कॉम्प्यू.)डीबीएम | कॉम्प्यू.टेक्निक |
| 10. श्री.गो.दे.जोशी | एस.एस.सी ,आय.टी.आय | लिपीक |
| 11. श्री.श्री.शा.गरड | एस.एस.सी. | हमाल |
| 12. प्रा. एस.एम. बनसोडे | बी.एस्सी.एम.लीब. I.S.C.एम.फील सेट नेट | ग्रंथपाल |





विद्यार्थ्यासाठी आचार संहिता

- विद्यार्थ्यांनी दररोज महाविद्यालयाच्या विहित वेळेतच महाविद्यालयात उपस्थित रहावे.
- महाविद्यालयात होणाऱ्या सर्व तासिकांना हजेरीपत्रकावर स्वाक्षरी करावी.
- महाविद्यालयात दिलेले वर्गपाठ व गृहपाठ वेळेवर पूर्ण करावेत.
- पर्यावरण प्रकल्प वही व सेशनल वर्क बुक वेळेत दाखल करावेत.
- महाविद्यालयात होणाऱ्या घटक चाचणी, सत्र, सराव परीक्षांना उपस्थित रहावे.
- दररोज गणवेशातच महाविद्यालयात उपस्थित रहावे.
- महाविद्यालय परिसरात गुटखा, तंबाखु सवेन करु नये, जर असे दिसून आले तर कडक कार्यवाही करण्यात येईल.
- महाविद्यालय परिसरात भ्रमणध्वनी संच, आवाज विरहीत असावा. वर्गात पूर्णपणे बंद स्थितीत असावा.
- महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थी / विद्यार्थिनींची उत्पीडन (रँगीग) करताना आढळल्यास कायदेशीर कार्यवाही करुन प्रवेश रद्द केला जाईल.
- महाविद्यालय परिसरात प्रवेश केल्यानंतर परिसर सोडेपर्यंत बंधनकारक राहील.




+ 2 स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम हा दोन वर्षांचा असतो. यामध्ये इ. 11 वी व इ. 12 वी सोबत हा अभ्यासक्रम पूर्ण होतो.

या व्यवसाय शिक्षण विभागामधील प्रत्येक अभ्यासक्रमास प्रवेश मर्यादा 20 इतकी आहे .





# कॉम्प्यूटर टेक्निक (सी.टी.)
# Computer Technique (C.T.)
## संगणकशास्त्र अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये :-**

- संगणकावर भरपुर प्रात्यक्षिकांची सुविधा.
- स्वतंत्र ऑडीओ/व्हीडीओ लॅग.
- अनुभवी प्राध्यापक वृंद.
- वैयक्तिक मार्गदर्शन.
- नेटवर्कींग/इंटरनेट सेवा/हार्डवेअर ची सोय.

**भवितव्य :-**

- इ. 12 वी नंतर स्वतंत्र व्यवसाय करता येतो.
- शासकिय व निमशासकीय कार्यालयात नौकरीची संधी.

**नोट :-** सदरील अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्त्वावर असल्यामुळे या विषयासाठी वार्षिक शुल्क रु. 1500/- असेल.

## XII Computer Technique नंतरचे शिक्षण :-

1. शासकिय/अशासकीय अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास सरळ दुसऱ्या वर्षास प्रवेश.
2. बी.एस्सी/बी.कॉम/बी.ए शाखेच्या प्रथम वर्गास प्रवेश.
3. बी.सी.ए/बी.सी.एस/बी.एस्सी (आयटी)/बी.बी.ए या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येतो.

## Job Opportunity :-

1) DTP Entry Operator 2) DTP Operator 3) Hardware & Network Technician 4) Assistant of Data Base Administrator. 5) Web designer 6) Animator

**मार्च 2016 मधील गुणवंत विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| 1. चि. बनाळे महादेव उमाकांत | - 480 | - 73.84 % |
| 2. कु. कंगळे मृणाल अनिल | - 467 | - 71.84 % |
| 3. चि. मुळे भागवत रामभाऊ | - 434 | - 66.76 % |

# अधिकोषण (बँकिंग)
# Banking
## वाणिज्य अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये :–**

- व्यावहारीक ज्ञानावर भर
- प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञानार्जन
- बँक व्यवसाय तज्ञाचे मार्गदर्शन
- बँक व्यवहार हाताळण्यास संधी
- संगणकीकृत बँक प्रणाली व त्यातील महत्त्वाच्या बाबींवर प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाते

**प्रकल्प :–**

- इ.12वी नंतर पदवी परीक्षेस बसता येते.
- अभ्यासक्रम पुर्ती नंतर प्रशिक्षण सुविधा.
- विविध बँक, पतसंस्था मध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून संधीची शक्यता.
- प्रशिक्षण काळात विद्यावेतन सुविधा.
- बी.कॉम, बी.ए., बी.सी.एस, बी.बी.ए., सी.एस आदी अभ्यसक्रमांना प्रवेश मिळतो.

**उपलब्धी :–** आत्तापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना बँक, पतसंस्था मध्ये नौकरीची संधी तसेच स्वतंत्र व्यवसाय सुरु केले आहेत.

**मार्च 2016 मधील गुणवंत विद्यार्थी :–**

| | | |
|---|---|---|
| 1. कु. सुरवसे पुजा अशोक | – 567 | – 87.23 % |
| 2. चि. चव्हाण ऋषिकेश अशोक | – 561 | – 86.30 % |
| 3. कु. सोनवणे शुभांगी वसंत | – 531 | – 81.69 % |



भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई
माहिती पुस्तिका
२०१६ -१७

## इ. 11 वी व 12 वी नियमित प्रवेशच्या वेळी आवश्यक कागदपत्रे

1. **विहीत नमुन्यातील प्रवेश अर्ज**
   खालील पैकी एक अर्ज फी माफी साठी
2. **इ.बी.सी. (खुल्या प्रवर्गातील फक्त मुलींसाठी)**
   इ.बी. सी.ची सवलत मिळविण्यासाठीचा अर्ज व त्यावर विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक आहे. उत्पन्न प्रमाणपत्रावर विशिष्ट मर्यादिपर्यंतच्या प्रमाणपत्रावर विशिष्ट मर्यादपर्यंतच्या प्रमाणपत्रावर सरपंच / विशेष न्याय दंडाधिकाऱ्याची स्वाक्षरी आवश्यक आहे.
3. **कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र** – दोन प्रतीत (फक्त मुलींसाठी)
4. **माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांसाठी** (मुले व मुली)

शुल्क माफीचा अर्ज दोन प्रतीत त्यावर वडील /पालक ज्या माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नोकरी करतात तेथील मुख्याध्यापक/ प्राचार्यांची स्वाक्षरी असावी.

5. **पी.टी.सी.**

प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यासाठी फी माफीचा अर्ज दोन प्रतीत व त्यावर संबंधित मुख्याध्यापक / गटशिक्षण अधिकारी यांची स्वाक्षरी असावी. फी माफीसाठीचा अर्ज प्रवेश अर्जासोबतचे मिळतो.

6. **मागासवर्गीय विद्यार्थी / विद्यार्थिनीसाठी**
   – जी. ओ. आय. स्कॉलरशिप फॉर्म
   – जात प्रमाणपत्र व तीन सत्यप्रती

– इ. 11 वी व 12 वी मधील सर्व विभागातधील मागासवर्गामधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरावा. अर्जावर फोटो लावावा त्यासोबत दहावीचे गुणपत्रक व टी. सी. यांच्या छांयाकित 02 प्रति व सोबतच उत्पन्नाचे तहसील मधून मिळालेले मूळ प्रमाणपत्र व दोन छायांकित प्रती सोबत जोडाव्यात.

## प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे

1. शुल्क विवरण
2. प्रवेश फॉर्म
3. गुणपत्रक (दहावी/अकरावी) व तीन सत्यप्रती.
4. मुळ टी. सी. व तीन सत्यप्रती.
5. फी माफी चा (सवलतीचा) फॉर्म
6. फी माफी दिलेली पावती / पावत्या जपून ठेवाव्यात.
7. पासपोर्ट फोटो
   - प्रवेशाच्यावेळी एक
   - ओळखपत्रासाठी टिकीट साईज एक
   - स्कॉलरशिप अर्जासाठी एक
   - प्रमाणपत्रासाठी एक
8. आधारकार्डची सत्यप्रत

**इ. 11वी ए.टी.के.टी. प्रवेशाच्या वेळी आवश्यक कागदपत्रे**

1. ए.टी.के.टी. प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज मिळतो तो भरावा.
2. कमाल दोन विषयात अनुत्तीर्ण (नापास) असावा.
3. गुणपत्रक व तीन सत्यप्रती
4. शाळेतील मुळ बोनाफाईड व तीन सत्यप्रती

**नोट :**

इ. दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर मूळ टी.सी. व तीन सत्यप्रती उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक हे कागदपत्र कार्यालयात ताबडतोब दाखल करावे नसेल तर अबरावीचा निकाल जाहीर होत नाही.



भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे
खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई
माहिती पुस्तिका २०१६ -१७

## पर्चेसिंग आणि स्टोअर किपींग (क्रय आणि भांडारपालन)

## Purchasing & Store Keeping

## वाणिज्य अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये :-**

- भरपुर प्रात्यक्षिक व सराव
- तज्ञांच्या व्याख्यानाचा लाभ
- कंपनी, कार्यालये, भांडारगृहे यांना भेटी देणे
- उत्कृष्ट निकाल.
- स्वतःचा लघु - उद्योग सुरू करण्याविषयी मार्गदर्शन

**भवितव्य :-**

- स्वतःचा उद्योग प्रारंभ करता येतो.
- शासन नियमानुसार अ‍ॅप्रेंटीसशीप मिळू शकते.
- शिकत असताना प्रशिक्षण (OJT) उपलब्ध
- विविध शासकिय, निमशासकीय, सहकार व कंपन्या मध्ये स्टोअर किपर, क्लार्क, पर्चेसिंग क्लार्क म्हणून नौकरी मिळू शकते.
- इ.12वी नंतर बी.कॉम, बी.ए. बी.सी.एस, बी.सी.ए. ला प्रवेश मिळू शकतो.

**मार्च 2016 मधील 12 वी गुणवंत विद्यार्थी -**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | चि. पांचाळ अक्षय अशोक | - 522 | - 80.30% |
| 2. | चि. अंबेकर शुभम शिवाजी | - 479 | - 74.00% |
| 3. | चि. राठोड लक्ष्मण धोंडीराम | - 457 | - 70.30% |

# फलोधान (हॉर्टीकल्चर)
# Horticulture
## कृषी अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये**

- स्वतंत्र विभाग – सुसज्ज प्रयोगशाळा – तज्ञ अध्यापक

**भवितव्या**

- इ. 12 वी नंतर डी.एड. ला प्रवेश घेता येतो.
- इ. 12 वी हॉर्टीकल्चर नंतर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठांतर्गत बी.एस्सी ॲग्री व बी.एस्सी हॉर्टीकल्चर ला प्रवेश घेता येतो.
- इ. 12 वी नंतर बी.सी.ए, बी. एस्सी, बी.कॉम व बी.ए या पदवी परीक्षेस प्रवेश मिळू शकता.
- गार्डनर, हॉर्टीकल्चर असिस्टंट, सिड प्रॉडक्शन असिस्टंट, कृषि विषयक उद्योग, दुग्धाशास्त्र विभाग, आदि व्यवसायात सेल्समन, सरकारी निमशासकिय, खाजगी संस्था, महाविद्यालये यामध्ये सेवा करता येते.

**खालील स्वयंरोजगार करता येतात –**

1. रोपवाटीका व्यवस्थापन.
2. फळे, भाजीपाला, फुले यांचे उत्पादन.
3. फुले, भाजीपाला योच बीज उत्पादन.
4. फुलांची विक्री.
5. फळांची साठवणुक (शीत गृह)
6. आत्तापर्यंत हा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा व्यवसाय, नौकरीस प्रारंभ झाला
7. एप्रिल 2010 मध्ये क्रॉप लाईफ प्रा. लि. नागपुर या कंपनीत एकूण पाच विद्यार्थ्यांची निवड होऊन त्यांना नोकरी मिळाली.
8. मार्च 2014 च्या बोर्ड परीक्षेत कु. करंजकर समेधा प्रशांतराव या विद्यार्थिनीस धीरुभाई अंबानी शिष्यवृत्ती प्राप्त.

**मार्च 2016 मधील 12 वी गुणवंत विद्यार्थी**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | कु. पुरी संध्या देवानंद | – 527 | – 81.07% |
| 2. | कु. मस्के गितांजली रामकिसन | – 494 | – 76.00% |
| 3. | कु. स्वामी श्रध्दा उमाकांत | – 490 | – 75.38% |





## + 2 स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम

+ 2 स्तरावर उच्च माध्यमिक व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम (किमान कौशल्य) आधारित व्यावसायिक अभ्यासक्रम हा दोन वर्ष कालावधीलचा आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या व संगणकाच्या जलद युगात सुशिक्षित बेकारांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी व्यावसायिक शिक्षण हाच पर्याय आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी म्हणजे केवळ व्यावसायिक शिक्षण नव्हे तर समाजातील सर्व व्यवसाय कोणत्याही व्यक्तीस कौशल्याने करता यावेत यासाठी त्या – त्या व्यवसायाचे किमान ज्ञान विद्यार्थ्यास मिळविता यावे व त्यास स्वतंत्र व्यवसाय किंवा तांत्रिक रोजगार करता यावा, यासाठी भारत सरकारने ही योजना काढली आहे. या योजनेनूसार आपल्या महाविद्यालयात सहा अभ्यासक्रम शिकविले जातात. इ. 11 वी ला अन्य शाखांप्रमाणेच या अभ्यासक्रमासाठी इंग्रजी, द्वितीय भाषा, व पायाभूत अभ्यासक्रम हे विषय घ्यावे लागतात. अन्य तीन विषय ऐच्छिक विषय हे त्या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे पेपर असतात.

दोन वर्षामध्ये विद्यार्थ्यांना थेअरी शिक्षणाबरोबरच प्रात्यक्षिक शिक्षणाच्या माध्यमातून त्या व्यवसायाचे कौशल्य ज्ञान देखील प्राप्त होते. इ.12 वी चे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्या विषयात अनुभवासाठी एक वर्ष विद्यावेतनासह शिकावू उमेदवारीसाठी निवड होऊ शकते.

# वैद्यकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ (M.L.T.)
## वैद्यकीय अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये**

- भरपूर प्रात्यक्षिके हा या अभ्यासक्रमाचा आत्मा आहे.
- नियमित उपस्थिती आवश्यक आहे.
- संबंधित व्यवसायांना भेटी हा ही एक महत्वाचा भाग आहे ज्यातून अनुभव मिळतो.
- आतापर्यंत हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या 23 विद्यार्थ्यांना व्यवसाय / नौकरीस प्रारंभ झाला आहे.

**भवितव्य**

- डॉक्टरांच्या मदतीने स्वतःचा व्यवसाय (प्रयोगशाळा/ लॅब) उभारता येते.
- खाजगी, शासकीय रुग्णालय, पॅथॉलॉजी लॅब, मेडिकल कॉलेज आदीमध्ये प्रयोगशाळा तंत्रज्ञ व सहाय्यक म्हणून नौकरीत संधी
- पॅरामेडीकल मधील उच्च शिक्षणासाठी प्रवेश मळू शकतो. बी.एस्सी. (जनरल), बी. एस्सी (एम.एल.टी.) अभ्यासक्रमांना प्रवेश मिळतो.

**उपलब्धी** : आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार निर्माण करुन यशस्वी जीवनाची वाटचाल सुरु केली आहे.

**उज्वल यशाची निरंतर परंपरा**

वैद्यकीय प्रयोगशाळेमध्ये आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींचे परिपूर्ण ज्ञान मिळविता येते.

**मार्च 2016 मधील 12 वी गुणवंत विद्यार्थी**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | कु. साठे पुजा गंगाधर | 520 | 80.00 % |
| 2) | कु. शिंदे पल्लवी मारोती | 519 | 79.8 % |
| 3) | कु. काशिद मोहिनी शत्रुध्न | 495 | 76.15 % |





# क्ष - किरण तंत्रज्ञ (एक्स - रे)
## X-Ray Tech.
## वैद्यकीय अभ्यासक्रमावर आधारित अभ्यासक्रम

**वैशिष्ट्ये**

- एक्स - रे मशिनवर भरपूर प्रात्यक्षिकांची सुविधा
- वैयक्तिक मार्गदर्शन
- उत्कृष्ट निकाल
- तज्ञ - डॉक्टर - अध्यापक

**भवितव्य**

- इ. 11 वी नंतर सेवांतर्गत प्रशिक्षण (OJT) खाजगी हॉस्पिटलमध्ये करता येते.
- इ. 12 वी नंतर सेवा संधी
- इ. 12 वी नंतर बी.ए., बी. एस्सी, ला सुद्धा प्रवेश
- इ. 12 वी नंतर स्वतंत्र व्यवसाय सुरु करता येतो .
- सरकारी, खाजगी दवाखान्यातून एक (1) वर्षाच्या विद्यावेतनासह शिकावू उमेदवारी करता येवू शकते.
- मुंबई, पुणे, लातूर येथे C.T.Scan, MRI Scan ला प्रवेश घेता येतो.

**उपलब्धी**

- औरंगाबाद, मुंबई, पुणे येथे याच विषयात अनेक विद्यार्थी प्रवेशित B.Sc. (MIT) साठी
- अनेक विद्यार्थी क्ष- किरण तंत्रज्ञ, एम.आर.आय. तंत्रज्ञ, म्हणून लातूर, मुंबई, पूणे, अंबाजोगाई येथे कार्यरत
- DMER, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन ने 2015 मध्ये घेतलेल्या परीक्षेत 05 विद्यार्थी पात्र

मार्च 2016 मधील 12 वी गुणवंत विद्यार्थी

1) कु. खडके कुंपावती सर्जेराव - 507 - 78.00 %
2) कु. जाधव प्रियंका गोविंदर - 74.46 %